## प्रशिक्षणार्थिंसाठी ची प्रवेश पध्दती

कोणत्याही भरतीसाठी प्रशिक्षण चांगल्या प्रकारे होण्याकरिता कमीत कमी दोन महिन्यांचा कालावधी लागतो. म्हणून मेस्को करिअर ॲकॅडमी मधे प्रत्येक शिबिर ६० दिवसांसाठी चालविले जाते. ६० दिवसांच्या शिबिरामध्ये शैक्षणिक प्रशिक्षणाचे (लेखी परिक्षेसाठी) एक आवर्तन पूर्ण होत. ॲकॅडमी तर्फे उमेदवारांना दोन महिन्यांसाठी प्रवेश घेण्याचा सल्ला दिला जाता, परंतु वेळे अभावी, आर्थिक कष्ट किंवा इतर कोणत्याही वैयक्तिक कारणामुळे जर एखादा उमेदवार दोन महिन्यांसाठी प्रवेश घेऊ शकत नासेल तर अशा उमेदवारास एका महिन्याच्या प्रशिक्षणासाठी सुध्दा प्रवेश दिला जातो. शिबिरां बाबतची माहिती महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या मा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना अवगत केली जाते. सदरची माहिती प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रमुख प्रसार माध्यमाव्दारे प्रसारीत केली जाते. तशेच शिबिर सुरु होण्याआधी काही जिल्ह्यांच्या ठिकाणी मेस्को करिअर ॲकॅडमीचे प्रतिनिधी जाऊन तिथल्या उमेदवारांना भरती व प्रशिक्षण संदर्भात योग्य ती माहिती व सल्ला देतात. आमच्या प्रतिनिधीच्या भेटीचे वेळापत्रक 'Visit Schedule of MCA Representative' या टॅब खाली दिले आहे.

वर्ष २०१५ साठीचा शिबिर कार्यक्रम MCA Training Programme या टॅब मध्ये उपलब्ध आहे. उमेदवारांनी शिबिर सुरू होण्याच्या एक दिवस आधी यायचे आहे. काही कारणामुळे या दिवशी येणे न जमल्यास आठवड्यातील कोणत्याही दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत पूर्व सूचना न देता उमेदवार प्रशिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकतात. उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी प्रवेशाच्या तारखेपासून मानला जातो.

ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेताना खालील कागदपत्रे व साहित्य आपल्या बरोबर आणावयाचे आहे :-

(क) शैक्षणिक प्रमाणपत्र व गुण पत्रक.
(ख) लेखन साहित्य - पेन आणि ६ रिफील्स
(ग) दोनशे पानी ४ फ़ूलस्केप वह्या
(घ) लेखी परीक्षेसाठी पॅड (क्लीपबोर्ड)
(च) पांढ़रे कॅनव्हास शूज एक जोडी
(छ) पांढ़रे सॉक्स पांढ़रे सॅन्डो बनियन,खाकी बरमुडा प्रत्येकी २ जोड्या
(ज) पासपोर्ट आकाराचा रंगीत फ़ोटो - ०१
(झ) किरकोळ खर्चासाठी काही पैसे

टिप - १. ॲकॅडमीमध्ये खाट, गादी, उशी, मच्छरदाणी, चादर, ताट, वाटी, ग्लास, आणण्याची गरज नाही.

२. ॲकॅडमीमध्ये मोबाईल आणण्यास सक्त मनाई आहे.